


# प्रत्ययाचे बिंब

आसावरी काकडे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# प्रत्ययाचे बिंब

**छायाचित्र-कविता**

## आसावरी काकडे

# प्रत्ययाचे बिंब

छायाचित्रे व काव्य : आसावरी काकडे
'सेतू' डी १/३, स्टेटबँकनगर, कर्वेनगर, पुणे, ४११०५२ .
फोन नं. ९४२१६७८४८० / ९७६२२०९०२८
Email- asavarikakade@gmail.com
Blog- asavarikakade.blogspot.com

मुखपृष्ठ: आसावरी काकडे

या पुस्तकातील लेखनाचे व छायाचित्रांचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक – ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

9869674820 (Whatsapp)

प्रकाशन : ३ मे २०२२ (अक्षयतृतिया १९४४)

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.



## आसावरी श्रीनिवास काकडे

**बी.कॉम., एम.ए. मराठी,**

**एम.ए. तत्त्वज्ञान**

# प्रकाशित पुस्तके- २७

## गद्यलेखन-

* ‘कवितेभोवतीचं अवकाश’ **(लेखसंग्रह)**
* ‘ईशावास्यम् इदं सर्वम्.. : एक आकलन-प्रवास’ **(तत्त्वज्ञान)**
* ‘अथांग’- **(अनुवादित कादंबरी)** बिन्द्या सुब्बा यांच्या ‘अथाह’ या साहित्य अकादेमी पुरस्कार प्राप्त मूळ नेपाळी कादंबरीचा मराठी अनुवाद.
* आनंदी गोपाळ **(कादंबरी- संक्षिप्त आवृत्ती)** श्री. ज. जोशी यांच्या आनंदी गोपाळ या कादंबरीचे कुमारवयीन मुलांसाठी संक्षिप्तीकरण

## कवितासंग्रह-

**मराठी- ९**

‘आरसा’, ‘आकाश’, ‘लाहो’, ‘मी एक दर्शनबिंदू’, ‘रहाटाला पुन्हा गती दिलीय मी’, ‘स्त्री असण्याचा अर्थ’, ‘उत्तरार्ध’, ‘व्यक्त-अव्यक्ताच्या मध्यसीमेवर’ आणि ‘भेटे नवी राई’

**हिन्दी- ३**

‘मौन क्षणों का अनुवाद’, ‘इसीलिए शायद’, आणि ‘मेरे हिस्से की यात्रा’- (स्वतःच्या निवडक मराठी कवितांचा हिन्दी अनुवाद. या हिंदी अनुवादाचा तमिल अनुवाद प्रकाशित झाला आहे.)

## अनुवादित- ४

* ‘बोल माधवी’ (चन्द्रप्रकाश देवल यांच्या ‘बोलो माधवी’ या हिन्दी कवितासंग्रहाचा अनुवाद),
* ‘तरीही काही बाकी राहील’ (विश्वनाथ प्रसाद तिवारी यांच्या निवडक हिन्दी कवितांचा अनुवाद),
* ‘लम्हा लम्हा’ (दीप्ति नवल यांच्या ‘लम्हा लम्हा’ या कवितासंग्रहाचा अनुवाद),
* ‘तू लिही कविता’ (डॉ. दामोदर खडसे यांच्या ‘तुम लिखो कविता’ या कवितासंग्रहाचा अनुवाद)

**बालगीतसंग्रह- ५**

‘टिक टॉक ट्रिंग’, ‘अनु मनु शिरू’, ‘जंगल जंगल जंगलात काय?’(इसाप गाणी),
‘भिंगोऱ्या भिंग’, आणि ‘ऋतुचक्र’

## इ-पुस्तके- ९

‘आकलनाच्या नव्या तिठ्यावर’ (छायाचित्र-कविता)
‘विचारांचे कवडसे’ (लेख संग्रह)
‘विचारार्थ’ (लेख संग्रह)
आनंदाचा अनुकार : ज्ञानेश्वरीतील उपमादृश्ये
Thoughts in a Nutshell by L. K. Apte (मराठी भावानुवाद)
अंत ना आरंभ (लेख संग्रह)
आकाश कवितासंग्रह- ईआवृत्ती
लाहो कवितासंग्रह- ईआवृत्ती
प्रत्ययाचे बिंब : छायाचित्र-कविता
प्रभाते मनी (चिंतनपर लेखन)

ब्लॉग्ज- ‘ब्लॉग, एक नवी सुरुवात’ या ब्लॉगमधे विषयानुसार बनवलेले दहा ब्लॉग्ज एकत्रित. (http://www.asavarikakade.blogspot.com)

## काही महत्त्वाचे पुरस्कार-

* ‘बोल माधवी’- साहित्य अकादेमी, नवी दिल्लीचा अनुवाद पुरस्कार २००६
* ‘इसीलिए शायद’- केंद्रीय हिंदी निदेशालय, नवी दिल्लीचा ‘हिंदीतर भाषी हिंदी लेखक पुरस्कार
* ‘मेरे हिस्से की यात्रा’- महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमीचा संत नामदेव पुरस्कार
* ‘आरसा’ आणि ‘मी एक दर्शनबिन्दू’ या संग्रहांना महाराष्ट्र राज्य पुरस्कार
* बालसाहित्यासाठी औरंगाबादच्या परिवर्तन संस्थेचा कै. ग.ह. पाटील पुरस्कार
* ‘कवितेभोवतीचं अवकाश’- आचार्य अत्रे स्मृति प्रतिष्ठान केशवकुमार आचार्य अत्रे पुरस्कार
* ‘ईशावास्यम् इदं सर्वम्...’- सार्वजनिक वाचनालय, नाशिकचा ग. वि. अकोलकर पुरस्कार.
* एकूण लेखनासाठी गो. नी.दांडेकर स्मृति **‘मृण्मयी’ पुरस्कार,** * पुणे मराठी ग्रंथालय, पुणेचा साहित्य सम्राट **न. चिं. केळकर पुरस्कार,** गोमंत विद्या निकेतन, मडगाव, गोवा या संस्थेच्या वतीने दिला जाणारा **दामोदर अच्युत कारे गोमंतदेवी पुरस्कार. २०२१**

## इतर सन्मान

* इयत्ता सातवी ते एम. ए. पर्यंतच्या विविध वर्गांच्या अभ्यासक्रमात व विविध संपादित संग्रहांमधे वरील संग्रहांमधील कवितांचा समावेश.
* आकाशवाणी, नवी दिल्ली तर्फे आयोजित सर्वभाषी कविसंमेलनात(२००२) मराठीचे प्रतिनिधित्व
* हिन्दी साहित्य सम्मेलन, प्रयाग (अलाहाबाद) द्वारा ‘सम्मेलन सम्मान’- २००४
* अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनासह अनेक महत्त्वाच्या साहित्यिक कार्यक्रमांमधे कवितावाचन, निबंधवाचन, भाषण अशा प्रकारचा सहभाग.



**केशरी आसक्ती  अशी ओलीचिंब**
**प्रत्ययाचे बिंब  काळजात.. !**

## मनोगत

२०१५ साली मी 'प्रत्ययाचे बिंब' नावानं एक ब्लॉग तयार केला होता. या ब्लॉगच्या स्वरूपाविषयी मी मनोगतात लिहिलं होतं, - ‘रोज सकाळी फिरताना जवळ फोन असतो. नजरेला दिसत असतात असंख्य दृश्यं. त्यातलं एखादं दृश्य पाऊल पुढं पडू देत नाही. कधी त्यातलं सौंदर्य मोहवतं तर कधी वेगळेपण.. मग ते टिपलं जातं. ही निवड अगदी सहज आणि निर्हेतुक असते. आवडलेला फोटो मोबाइलचा वॉलपेपर बनतो. सुप्रभात म्हणून कुणाकुणाला पाठवला जातो. फोटोखाली एकदा अभंग छंदात दोन ओळी लिहिल्या गेल्या. छान वाटलं. प्रतिसादही छान मिळाला. मग छायाचित्र-कविता हा छंद अभिव्यक्तीची शैली म्हणून मनात रुजू झाला.

या ओळी सुचणं म्हणजे एका परीनं तो फोटो समजणं... किंवा फोटोच्या माध्यमातून आतलं आकलन स्पष्ट होणं.... काही ओळींमधे निखळ सौंदर्याचा आस्वाद घेतला गेला आहे. काहींमधे काहीसं तत्त्वचिंतन जाणवू शकेल. तर काहीत सामाजिक स्थितीची बोच व्यक्त झालीय... फोटो पाहून प्रत्येकाला वेगळा प्रत्यय येऊ शकेल. ‘प्रत्ययाचे बिंब’ नावानं मला आलेले प्रत्यय इथे शेअर करतेय...’

त्या ब्लॉगचं आता कॉफी टेबल बुक स्वरूपात ई पुस्तक करत आहे. त्यासाठी ब्लॉगची वर्ड फाईल बनवून देण्याचं काम माझा भाऊ केशव आपटे यानं तत्परतेनं आणि मला हवं तसं करून दिलं. ई साहित्य प्रतिष्ठान यांनी अतिशय आत्मीयतेनं त्यात आवश्यक ते कलात्मक बदल केले. या निर्मितीमधील दोघांच्या हार्दिक सहकार्याबद्दल मी कृतज्ञता व्यक्त करते.

या ई-पुस्तकात काव्यात्म भाष्यासह १३५ छायाचित्रं संकलित केलेली आहेत. एकाच वेळी ती अंतर्मुख करतील आणि छायाचित्रांच्या दृश्य माध्यमातून नजरेला आनंदाचा अनुभव देतील. यांचा आस्वाद म्हणजे आत-बाहेर नेऊन आणणारी एक सुखद यात्रा असेल...

- आसावरी काकडे

# एकलेच बिंब



**एकलेच बिंब बघे भोवताली**
**प्रतिबिंब खाली वाट पाहे..!**

# रे आकाशा



रे आकाशा मिरव तुझे तू रंग कितीही
तुला सजवतो त्यावर नक्षी कोरुन आम्ही

## मालवाया तम



**मालवाया तम पूर्ण चंद्र आणि**
**इवली चांदणी आली घरा**

# जपलेत तिने



जपलेत तिने आत किती स्वर
छेडाया अधीर कृष्ण हवा

# पाने फुटलीच



**नको म्हणताना पाने फुटलीच**
**कळ उठलीच जगण्याची..!**

# नजर न लागो



**नजर न लागो ध्यानस्थ सुखाला**
**शब्द थबकला नजरेत..!**

# तळ्याकाठी तळे



तळ्याकाठी तळे  तिचे एकटीचे
तिच्या तरंगांचे  राज्य तिथे..!

# अर्थ असण्याचा



**समजता अर्थ असण्याचा रंगला रास झाडावर**
**अवरोह उतरला खाली आरोह गायल्यानंतर..!**

# नवी नृत्यमुद्रा




**नवी नृत्यमुद्रा प्रश्नांचा गुंताळा**
**की शुद्ध कंटाळा असण्याचा..!**

# तुलाही सुंदरा



**तुलाही सुंदरा तगादा भुकेचा**
**विसर नभाचा पाडणारा..!**

## ...पाय नाही पंख..




**पाय नाही पंख दिलेस दयाळा**
**देठात कशाला गुंतविले..?**

# भय नाही त्यांना..



भय नाही त्यांना अनंत काळाचे
फुलणे क्षणाचे पुरे आहे..!

# अहं निरसुनी




**अहं निरसुनी होताच सावली**
**फुले उमलली अंतरात..!**

# अद्वैताचा बंध..



**अद्वैताचा बंध तोडूनिया आल्या**
**द्वैताच्या पाकळ्या धरेवर..!**

# क्षणाची रांगोळी..




**क्षणाची रांगोळी क्षणाच्या अंगणी**
**क्षणाची गृहिणी रेखतसे..!**

## शेंडा न बुडखा..



शेंडा न बुडखा अशा आठवणी
तुटलेली लेणी काळजात..!

# निळा डोह झाला




**वर खाली निळा डोह झाला अनावर**
**पैल म्हणे भरारीला सावर सावर..!**

# आता फुलली अबोली



**अंतर्बाह्य आता फुलली अबोली**
**वादळे निमाली राईतली..!**

## कोण फांदीवर..



कोण फांदीवर पहूडले शांत
अंगाई बुंध्यात गाते कोण?

# दोन पक्षी नभी..



**दोन पक्षी नभी एक खेळतोय**
**दुजा पाहतोय वरतून..!**

# मांडली कोणी कुणाची..



मांडली कोणी कुणाची ही स्वयंभू कुंडली
रिक्त आहे पूर्ण चौकट मुक्त ती ग्रहमंडळी..!

## ध्वस्त वास्तव भोवती पण



ध्वस्त वास्तव भोवती पण जीवनेच्छा प्रकटली
खिन्नशा बुंध्यामधूनी सांत्वना डोकावली..!

## कोसळतानाही..



**कोसळतानाही उंच केली मान**
**अस्तित्वाचे भान नृत्य झाले..!**

## निराकार स्वये..



**निराकार स्वये आले आकारास**
**सृजनाचा रास खेळावया..!**

## सरला उपसा..



**पाणी मागायला मुळे वर आली**
**दिठी आर्त झाली पाण्याविना..!**

# भूईतून वर..



भूईतून वर येताच बहर
अतर्क्य आहेर सृजनाचा..!

# गाली चंद्र-तीळ..



गाली चंद्र-तीळ गळा पाचू हार
काटेरी नकार डोळ्यांमध्ये..!

## एकांताची घळ..



**एकांताची घळ गवसली पण**
**असण्याचे भान टक्क जागे..!**

# एका बिंदूला..



एका बिंदूला हे घडले दर्शन
स्वयंभू नर्तन अवकाशी..!

# ज्योतींचे झुंबर..



**ज्योतींचे झुंबर बसले जागत**
**सुगंधी सोबत अंधाराला..!**

# निराधार धाव..



**निराधार धाव तरी त्यात डौल**
**काळाला ही हूल जगण्याची..!**

# गंधकुप्या उद्या..



**गंधकुप्या उद्या गंध सांडतील**
**रिकामे होतील गंधकोष..!**

# कुणाची साधना..



**कुणाची साधना अपुरी राहिली**
**योगमुद्रा झाली काष्ठशिल्प..!**

## थेंब थेंब त्यांनी..



**थेंब थेंब त्यांनी जपलाय उरी**
**नभाला माघारी देण्यासाठी..!**

## गळण्याचा क्षण..



**गळण्याचा क्षण पानांनी झेलला**
**योगायोग झाला भावपूर्ण..!**

# कुणी वाहतोय..



कुणी वाहतोय ओझे पुष्कळाचे
हाल दुष्काळाचे भोगे कुणी..!

# बंदिवासाचेही..



**बंदिवासाचेही भान नाही तिला**
**मृदंग आतला झंकारला..!**

# कोणत्याही क्षणी...



**कोणत्याही क्षणी डौल झेपावेल**
**चित्र विस्कटेल पहाटेचे..!**

# उगवली अंती..



**उगवली अंती अव्दैताची मिठी**
**कासावीस दिठी तृप्त झाली..!**

## सृजनाचा सोस..



**सृजनाचा सोस सृष्टीला नावरे**
**फुटले धुमारे पाषाणाला..!**

# गतकाल पूर्ण..



**गतकाल पूर्ण वाकलाय आणि**
**वर्तमान पाणी प्रदूषीत..!**

# उजाडले रंग..



**उजाडले रंग दरवळे नाद**
**शुभ्रतेचा गंध रुणझुणे..!**

## रात्रीने जाताना..



**रात्रीने जाताना प्राषिला अंधार**
**उजेडाला दार उघडले..!**

# गर्द मोहातून



**गर्द मोहातून जन्म झाला तरी**
**वल्कले केशरी लाभलीत..!**

# मेघ खाली आले ..



**मेघ खाली आले पाउले निघाली**
**कुणी हाक दिली पाय जाणे..!**

# निर्मात्याच्या पुढे..



**निर्मात्याच्या पुढे होऊन विनीत**
**जोडलेत हात निर्मितीने..!**

# तरंगांच्या सवे..



तरंगांच्या सवे तरंगे युगुल
सावळी चाहूल जळी-स्थळी..!

# गच्च हिरवाई..



गच्च हिरवाई वर कोंदाटली
शुभ्र डोहातळी काही नाही..!

# जगाकडे पाठ..



**जगाकडे पाठ फिरवून गेला**
**बोधिसत्व झाला जगासाठी..!**

# देउनिया गेला..



देउनिया गेला उड्डाणाचा वसा
पेरून भरोसा पंखांमध्ये..!

# फुलांनी लावले..



**फुलांनी लावले दिवे सभोवती**
**कशाला पणती शिळा म्हणे..!**

# चिंब निथळली..




**चिंब निथळली ओली काया पण**
**आतली तहान माती जाणे..!**

## कळीतले नभ..



**कळीतले नभ नभाला मिळाले**
**उमलणे झाले अर्घ्यदान..!**

## धावता देखावा..



धावता देखावा थेंबांची आरास
आनंदाचा रास काचेआड..!

# निराकारातून..



**निराकारातून बिंब उगवले**
**जणू साकारले परब्रह्म..!**

# पाण्यात निवास..



पाण्यात निवास पाणी अन्न-पाणी
पाणी श्वास आणि प्राण पाणी..!

# थेंब थेंब आयु..



**थेंब थेंब आयु गोळा होत जाते**
**आणि ओघळते हाक येता..!**

# कधी शिरच्छेद..



**कधी शिरच्छेद कधी विष दिले**
**कधी चढविले क्रुसावर..!**

## कोणाचे हे मन..




**कोणाचे हे मन इतके फुलले**
**लखख उजाडले अंतर्बाह्य..!**

# कोवळे काळीज..



**कोवळे काळीज पंख मिटवून**
**झाले आत्ममग्न अवेळीच..!**

# बंद नेत्र जरी..



**बंद नेत्र जरी बसले ध्यानस्थ**
**आतले पांथस्थ कौलावर..!**

# किती पूर्वजन्म..



किती पूर्वजन्म फिरून भेटली
हिरवी राहिली खुणगाठ..!

# ऐकू आली त्यांना..



**ऐकू आली त्यांना देठातली गाज**
**सडा होणे आज नाकारले..!**

# आड येती त्यांना..



**आड येती त्यांना कापून काढले**
**विस्थापित केले पाखरांना..!**

# किती शिल्पचित्रे..



**किती शिल्पचित्रे मातीस मिळती**
**किती उगवती मातीतून..!**

## कदंब-फुलांनी..



**कदंब-फुलांनी मोहविले राना**
**राधेसह कान्हा आठवला..!**

# कुणी मांडलाय..



**कुणी मांडलाय पट हा रानात**
**झाली काय मात खेळाविना..?**

## पंख पसरून..



**पंख पसरून भक्ष्याच्या शोधात**
**निर्वाह नि घात एकावेळी..!**

# काळ्या मातीवर



**काळ्या मातीवर हिरवे झुंबर**
**दंव पानांवर अळुमाळ..!**

# दृश्यांचा कल्लोळ



दृश्यांचा कल्लोळ पाण्याच्या काठाशी
प्रतिबिंबं कशी टाळणार..?

# पावसाच्या सरी..



**पावसाच्या सरी तशा येती हाका**
**कसे येऊ नका म्हणायचे..?**

# पानांचे तोरण



**पानांचे तोरण पानांची रांगोळी**
**घळ सजलेली केंव्हाचीच..!**

# निर्गुणास वाटे



**निर्गुणास वाटे ल्यावे रूप-गूण**
**फुटे पानातून ब्रह्मकळी..!**

# प्रतिबिंबामध्ये..



**प्रतिबिंबामध्ये फक्त बिंबाकृती**
**नाद गंध गती स्व-रूपात..!**

## आज आशा आहे..



**आज आशा आहे येईल पाऊस**
**होईल उरूस सृजनाचा..!**

# देखणे आकाश



**देखणे आकाश भरारी देखणी**
**वेरूळची लेणी आठवली..!**

# तरंग-लावण्य..



**तरंग-लावण्य बाहतेय पण**
**मुळांचे पैंजण रोखतात..!**

# गतीला रोखण्या..



**गतीला रोखण्या नाही कुणी वाली**
**आपणच झाली लाल दिवा..!**

# रंग रूप गंध...



**रंग रूप गंध टच्च भरलेत**
**उत्कंठा देठात फुलण्याची..!**

# तमाचे साम्राज्य..



तमाचे साम्राज्य सृष्टीला व्यापून
प्रकाशाची खूण चंद्रापाशी..!

# कोणाचे नेपथ्य..



**कोणाचे नेपथ्य कोण करविता**
**रंगमंच रिता टाळ्या घेई..!**

## असीमाला सीमा



असीमाला सीमा मान्य नाही त्याला
ओलांडून गेला क्षणार्धात..!

# तुरा नि पिसारा



तुरा नि पिसारा सारे सजलेत
साळुंकी तंद्रीत विसावली..!

# ईशावास्य सारे..



**ईशावास्य सारे हे जे आहे ते ते**
**रोज प्रकटते मावळून..!**

# सानुलेसे रोप..




**सानुलेसे रोप खेळ निरखत**
**निश्चिंत कवेत विराटाच्या..!**

## खोल गर्भातला



**खोल गर्भातला ओलेता अंधार**
**हिरवा गंधार आळवतो..!**

## केशरी उजेड..



**केशरी उजेड पाणीही केशरी**
**प्रतिबिंबाघरी आले बिंब..!**

# छोटे छिद्र होते



**छोटे छिद्र होते आता हे विवर**
**शून्याचा आकार मोठा फक्त..!**

## झाडाच्या सवेच



**झाडाच्या सवेच नृत्य उगवते**
**आकारास येते काष्ठशिल्प..!**

# निसर्गाची भाषा..



निसर्गाची भाषा मूक प्रत्ययांची
डौलदार तिची चित्रलिपी..!

# अलगद असे..



**अलगद असे झेलले फुलाला**
**जसे की बाळाला खेळवावे..!**

## असण्याचे भान..



**असण्याचे भान विणते तोरण**
**करते अर्पण ज्याचे त्याला..!**

# कुंडी प्रसवली..



**कुंडी प्रसवली जन्मले उद्यान**
**चौकटींचे भान साहवेना..!**

# व्दारपाल झाले




**काही न सांगता कुठूनसे आले**
**व्दारपाल झाले क्षणभर..!**

# भूत भविष्याचा..



# पंख हवे दोन..



# वेगळ्या स्वरात..



**वेगळ्या स्वरात गाणी कशी गावी**
**कशी बदलावी पार्श्वभूमी..?**

# सांगतच राही..




**सांगतच राही निसर्ग रंगून**
**घ्यायचे टिपून किती काय..?**

## कापून टाकती..



**कापून टाकती त्यांना हवे तसे**
**बीजांना हवेसे येते वर..!**

## मुक्त गातो आहे..



मुक्त गातो आहे निसर्गाचा भाट
दिवाळी पहाट आषाढात..!

## तरंग वरती..



**तरंग वरती खोलात काहूर**
**सुटतोच धीर पाण्याचाही..!**

# वर बहरते..



**वर बहरते मुळांची तहान**
**घेते बीजातून रंग-रूप..!**

# चिंब ढगातून..



**चिंब ढगातून जरा डोकावला**
**थेट खाली आला पृथ्वीवर..!**

# कितीतरी दृश्ये..



**कितीतरी दृश्ये रीतीच राहिली**
**पाखरे न आली चौकटीत..!**

# आकाशात मुक्त..



आकाशात मुक्त खेळतात पक्षी
रेखतात नक्षी नित्य नवी..!

## जाता जाता रात्र..



**जाता जाता रात्र अशी गोंधळली**
**चंद्र विसरली झाडावर..!**

## झाडे आनंदली..




झाडे आनंदली पाऊस झेलून
देठातली धून मोर झाली..!

# किती युगांचा हा..




किती युगांचा हा संचिताचा शीण
बुंध्यावर वीण वेदनांची..!

# गाऱ्हाणी घेऊन..





**गाऱ्हाणी घेऊन आकाशी निघाला**
**साद पावसाला घालावया..!**

## आकाश अंगण..




**आकाश अंगण झाडाची रांगोळी**
**चंद्रकोर कळी मधोमध..!**

# बंद साऱ्या वाटा..



बंद साऱ्या वाटा जमीन म्हातारी
आर्त टाहो तरी फुटलाच..!

# नव्यांसाठी खाली..



**नव्यांसाठी खाली उतरून आली**
**निर्मम ती झाली प्राणांतून..!**

## अदृश्य झाला तो..



अदृश्य झाला तो दृश्यातून जरी
स्मरणांच्या तीरी झेपावतो..!

## उमलण्या आधी..



**उमलण्या आधी सुकल्यानंतर**
**दिसते सुंदर नसणेही..!**

# आसवांसोबत..



**आसवांसोबत नेत्रही गळाले**
**अश्रू मग झाले डोळे दोन..!**

## गळालेली फुले..



**गळालेली फुले होऊनिया खत**
**पुन्हा फुलतात वृक्षावर..!**

## तहानली चोच..



**तहानली चोच व्याकुळ इकडे**
**थेंबुटा तिकडे कासावीस..!**

# कोणते काहूर..



कोणते काहूर आत रुजलेले
दुःख उगवले डोळ्यातून..!

## हिरव्या गर्दीत..




हिरव्या गर्दीत एकटे पडले
कुशीत घेतले माऊलीने..!

## ओवलेले मोती..




**ओवलेले मोती तसे न हे पक्षी**
**क्षणात ही नक्षी उडणार..!**

# पक्षी आडोशाला..




**पक्षी आडोशाला दृश्य दिसेनासे**
**पाऊस उसासे धुवांधार..!**

## कोणतीही फट..




**कोणतीही फट उगवाया पुरे**
**आकांताचे झरे आत जर..!**

## तोऱ्यात उभा हा..



**तोऱ्यात उभा हा इवलासा तुरा**
**करतो मुजरा आकाशाला..!**

# ओघळले नेत्र..



ओघळले नेत्र पाना-फुलांचेही
पर्जन्याची ग्वाही मिळताच..!

# वेगळाच स्नेह..



**वेगळाच स्नेह झाडांशी वेलींचा**
**हार अस्तित्वाचा समर्पिती..!**

## अप्राप्य आकाश..



**अप्राप्य आकाश रस्त्यावर आले**
**किती दीन केले त्याला आम्ही..!**

## बाळवडालाही..



**बाळवडालाही सोडले न त्यांनी**
**विद्रोह पानांनी केला तरी..!**

# कसा मी कोरडा..



**कसा मी कोरडा राहिलो अजून**
**पाण्यात असून कैक युगे..!**

## चित्र-विचित्रांचा..



**चित्र-विचित्रांचा खेळ जागोजाग**
**निसर्गाची बाग अनुपम्य..!**

## कशाकशाचा हा..



कशाकशाचा हा विळखा पडला
आता सुटकेला वाव नाही..!

# धरणीचा भार



**धरणीचा भार । करावया कमी**
**बुंधा होई भूमी । आपसुखे..!**

# पाण्याचीच नाव..



**पाण्याचीच नाव पाण्याचीच वल्ही**
**डौलात निघाली पाण्यासवे..!**

# एकत्र नांदती



एकत्र नांदती भक्ष्य नि भक्षक
निसर्ग रक्षक दोघांचाही..!

# कैलाशपती की..




कैलाशपती की वधू सजलेली
लाल वेषातली वृक्षकन्या?

# सोडावा की नको..





**सोडावा की नको एकांताचा डोह**
**बाहेरचा मोह भिववितो..!**


## आसावरी काकडे यांची ई साहित्यवर उपलब्ध ईपुस्तके
## कव्हरवर एकच क्लिक केले की पुस्तक उघडेल



















या कॉफी टेबल बुकमधे १३५ छायाचित्रं त्यावरील काव्यात्म भाष्यासह संकलित केलेली आहेत. एकाच वेळी त्यातल्या काव्यपंक्ती अंतर्मुख करतील आणि छायाचित्रांच्या दृश्य माध्यमातून नजरेला आनंदाचा अनुभव घेता येईल. दर्दी रसिकांसाठी यांचा आस्वाद म्हणजे आत-बाहेर नेऊन आणणारी एक सुखद यात्रा असेल... या छायाचित्रांना स्वतंत्र विभागाच्या सुंदर कोंदणात प्रकाशित करून 'सृजनसेतू' या वंदना बोकील-कुलकर्णी यांच्या दिवाळीअंकानं पहिली दाद दिली होती. त्यात त्यांनी या संदर्भात म्हटलं होतं-

## दृश्य दोन ओळी

आसावरी काकडे

आपल्याही नजरेला पडत असतात
नाना दृश्यं...
पण आपण ती 'पहात' नाही.
कविमनाला मात्र त्यातलं एखादं दृश्य
बांधून ठेवतं स्वत:पाशी.
कधी अनोखेपणानं...
तर कधी परिचितच पण मोहून टाकणाऱ्या
अम्लान सौंदर्यानं...
मग हाताशी असलेला मोबाइल ते टिपून घेतो
सहज आणि निर्हेतुक...
कधी तरी यथावकाश
ते दृश्य मनातल्या अक्षरांना जागं करतं...
आणि कवितेच्या 'दोन ओळी'
त्या दृश्याखाली अवतरतात...

**आसावरी काकडे** या मूलत: गंभीर प्रवृत्तीच्या कवयित्रीचा हा नवा आविष्कार...
अशा ओळी सुचणं हा ते दृश्य मनात नीट उतरल्याचा काव्यात्म पुरावाच!

उत्स्फूर्त, ताजा, इतरांच्याही मनातली कविता जागी करणारा हा वैशिष्ट्यपूर्ण प्रयोग सादर करतोय... जणू छायाचित्र आणि अक्षरं यांचा नवाच **'सृजनसेतू'!**

दिवाळी २०१५ | सृजनसेतू | ९७